अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 08 जानेवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 21 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# महामार्गाच्या संथ कामामुळे ब्रम्हपुरीकरांचे आरोग्य धोक्यात

## निकृष्ठ व संथ कामाविरोधात रिपब्लिकन पक्ष (खोरिपा)चे २६ जानेवारीपासून आमरण उपोषण

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी ते वडसा या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५५३ च्या रखडलेल्या कामामुळे आणि कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना न्याय देण्यासाठी रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) आता आक्रमक झाला आहे. या कामात होणारी दिरंगाई आणि प्रशासकीय दुर्लक्षाच्या निषेधार्थ २६ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे चौक येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा पक्षाने दिला आहे.

गेल्या १० ते ११ महिन्यांपासून या महामार्गाचे काम सुरू आहे. मात्र, कामाचा वेग अत्यंत संथ असल्यामुळे संपूर्ण परिसरात धुळीचे लोट पसरले आहेत. याचा गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, परिसरात श्वसनविकार, दमा, डोळ्यांचे आजार, त्वचेचे रोग आणि मणक्याच्या त्रासाचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या धुळीतून मार्ग काढताना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. कंत्राटदाराने रस्ते बांधकामाचे निकष आणि पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवल्याचा आरोप



निवेदनात करण्यात आला आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे आणि अर्धवट कामामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून, अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. १२ महिन्यांची मुदत असताना १० महिने उलटूनही काम पूर्णत्वाकडे नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे या कामाकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्यामुळे कंत्राटदार आपल्या मर्जीनुसार काम करत असल्याचे चित्र आहे. अधिकाऱ्यांच्या या हलगर्जीपणामुळेच सर्वसामान्य जनतेला अतोनात हाल सोसावे लागत आहेत, असा आरोप रिपब्लिकन पक्ष खोरीपा, तालुका ब्रह्मपुरी यांनी केला आहे. यासंबंधी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नामदार नितीन गडकरी यांना उपविभागीय अधिकारी (एअ्ध) ब्रह्मपुरी यांच्यामार्फत निवेदन पाठवण्यात आले आहे.

प्रशासनाने त्वरित दखल न घेतल्यास रिपब्लिकन पक्ष (खोरीपा) तालुका ब्रह्मपुरी च्या वतीने बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे चौक येथे २६ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता आमरण उपोषण करण्यात येणार आहे. त्यामुळे कामाला गती व दिलेल्या कालावधीत काम पूर्ण करण्याचे संबंधित विभागाला आदेश देऊन जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनो, जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाने यशोशिखर गाठा

## अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे : ने.हि. महाविद्यालयात वार्षिकोत्सव व शैक्षणिक श्रेष्ठता शिष्यवृत्ती वितरण सोहळा

ब्रह्मपुरी/का.प्र.

'अत्यंत खडतर प्रवास व प्रयत्न करुन कालीदास घडला, ज्याने 'मेघदूत' लिहले. आपण विद्यार्थी दशेत असतांना ज्ञानार्थी होण्यासाठी झटले पाहिजे. या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले, ते आपल्या क्षेत्रात नामवंत आहेत. राष्ट्रसंतांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन असून इथे शिकणारे तुम्ही भाग्यवान आहात. या आश्वासक परिसरात




आपण सारे ज्ञानाचे सारथी व्हावे आणि जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाने यशोशिखर गाठावे' असे मार्मिक भाष्य रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे अधिष्ठाता व प्रसिध्द वक्ते डॉ. कोमले ठाकरेंनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय व शांताबाई महिला महाविद्यालय आयोजित वार्षिकोत्सव व शैक्षणिक श्रेष्ठता शिष्यवृत्ती वितरण सोहळयात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

विचारपीठावर नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया अध्यक्षस्थानी होत्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ श्रीराम कावळे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव अशोक भैया, ब्रम्हपुरीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष योगेश मिसार तर प्रमुख उपस्थितीत कार्य. प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकर, प्राचार्य डॉ एम एस वरभे, प्रा मेजर विनोद नरड, वार्षिकोत्सव प्रभारी डॉ भास्कर लेनगुरे, डॉ हर्षा कानफाडे, शिष्यवृत्ती पुरस्कार प्रभारी डॉ.अजित खाजगीवाले, कला शाखा प्रमुख डॉ.राजेंद्र डांगे, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. रेखा मेश्राम, अधिक्षक संगीता ठाकरे, विद्यार्थी संघ अध्यक्ष सौरभ तलमले, श्रध्दा म्हशाखेत्री, सचिव कार्तिक गुरनुले, हर्षिता शेंडे इ.मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी पाहूण्यांचा सत्कार करण्यात आला. प्र- कुलगुरू डॉ कावळे यांनी ध्येयाची कास धरुन वाटचाल करा! असा सल्ला दिला तर अशोक भैयांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात श्रीमती स्नेहलताबाई भैयांनी, वार्षिकोत्सव हा विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी व कला गुणांच्या विकासाची पर्वणी आहे, असे सांगून शुभेच्छा दिल्या. पाहूण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक श्रेष्ठता शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहूण्यांचा परिचय कार्य. प्राचार्य डॉ सुभाष

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# निर्दयी व्यवस्थेचे बळी

भारतातील शहरात कोणतीही व्यवस्था नाही. इंदूर जे सलग आठ वर्षे स्वच्छ शहर म्हणून जगभरात परिचित होते, त्या शहरात गंभीर जनआरोग्य संकट निर्माण व्हावे आणि त्यात १५ जणांचा बळी जावा ही निश्चितच गौरवास्पद बाब नाही. उलट इंदूर स्वच्छ शहराच्या नावलौकिकाला काळिमा फासणार आहे.

स्वच्छ पेयजलाची समस्या खरेतर सन २०२६ मध्ये कुणालाही लांच्छनास्पद वाटावी. त्यातही इंदूरसारख्या स्वच्छ म्हणून गणल्या गेलेल्या शहरात तर ती जास्तच क्लेशदायक आहे. पण भारतात हे घडले आणि १५ नागरिकांचा बळी गेला. त्यामुळे जलसंकटाचे रूपांतर एका राष्ट्रीय आक्रोशात झाले. दूषित पेयजलाचा प्रकार घडला तो इंदूरच्या दाट आणि कमी उत्पन्न असलेल्या वस्तीत. १५ लोकांच्या मृत्यूने संपूर्ण देश हादरला. त्यापेक्षाही शासन व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित झाले. नेहमीप्रमाणे प्रशासन मृतांची आकडेवारी लपवण्यात मग्न आहे. नेमके किती लोकांना यात आपले प्राण गमवावे लागले याची माहिती कुणीही अधिकृत देत नाही. पण शहरी स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाबाबतीत आदर्श म्हणून सादर करण्यात येणारे मध्य प्रदेशातील इंदूर शहर हे सध्या भयावह जलसंकटाचे प्रतीक बनले. आंतरराष्ट्रीय स्तरावर या घटनेचे तीव्र पडसाद उमटणे साहजिक आहे. कारण ज्या शहराला त्याच्या स्वच्छतेबाबत नेहमीच वाखाणले जाते आणि ज्या शहराची उदाहरणे दिली जातात त्याच्या नगरपालिकेकडून अशी अक्षम्य चूक कशी होऊ शकते असा प्रश्न विचारला जात आहे. इंदूरची समस्या स्थानिक लोकांसाठी चिंतेचा विषय तर आहेच पण जागतिक स्तरावर निर्भत्सनेचा विषय बनला आहे. येथील लोकांनी अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने लोकांच्या तक्रारींकडे लक्षच दिले नाही. ही बाब त्यातल्या त्यात जास्त चिंताजनक आहे.

अनेक महिने लोक दुर्गंधीयुक्त पाण्याबाबत तक्रारी करत होते पण त्यांच्या तक्रारी आणि आवाज फायलींमध्ये दबलेले राहिले. नोकरशाहीच्या किचकट प्रक्रिया आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे या संदर्भात काहीच कारवाई झाली नाही. प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे, की पेयजल जलवाहिनीच्या वर एक शौचालय बांधलेले होते आणि त्यातून एक स्युएज पाण्याचा प्रवाह जलपूर्तीच्या प्रवाहात मिसळला गेला आणि त्यातही गंभीर बाब अशी की हे शौचालय कोणत्याही सेप्टिक टॅंकविनाच बांधले गेले होते. यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. नगर नियोजन आणि देखभाल आणि जबाबदारी निश्चित करण्याबाबत अनेक गंभीर सवाल उपस्थित झालेत. या पाण्याच्या नमुन्यात काही बॅक्टेरिया आढळले आहेत, जे हानिकारक आहेत.

आता राजकारण यावर सुरू झाले नसते तरच नवल. कारण राहुल गांधी यांनी भाजपशासित राज्य सरकारवर अत्यंत बेपर्वाईचा आरोप केला आणि त्यांनी म्हटले आहे, की हे पाणी नाही तर विष होते. पण राहुल यांच्या काँग्रेसच्या काळात कितीतरी घटनांत सरकारी बेपर्वाईमुळे लोकांचे जीव गेले. विरोधी नेता म्हणून राहुल यांना आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि ते आपले विचार मांडण्यास मोकळे आहेत. पण त्यांच्या टीकेला राजकीय वास येतो. मुख्यमंत्री यादव यांनी सांगितले की जल सुरक्षा योजना बनवली जाईल आणि नव्याने नियम बनवले जातील. विषारी वायू जितका घातक असतो तितकेच दूषित पेयजलही जीवघेणे असते हा या घटनेवरून मिळालेला धडा आहे. हा प्रश्न एकट्या इंदूरपुरता मर्यादित नाही, तर कोणत्याही लोकसंख्येच्या शहरासाठी तो तितकाच तीव्र आहे आणि विचार करायला लावणारा आहे.

**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...**
**www.bramhapurisamachar.com/bs**

# ने.हि. कन्या विद्यालयात माजी विद्यार्थीनी मेळावा

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारणी कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथे माजी विद्यार्थिनी



मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ डिसेंबर २०२५ शनिवारला स्वर्गीय किसनलालजी भैय्या सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम होत्या. विशेष अतिथी म्हणून माजी विद्यार्थिनी संघाचे अध्यक्षा डॉ.अंजली बनपुरकर तथा शाळेचे उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिकाखंडाते मॅडम यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रम शासकीय पत्रकाप्रमाणे तसेच स्नेहबंध ,ऋणानुबंध, आपुलकी ,भेटीगाठीचा हा क्षण कलामय जीवनातील अविस्मरणीय आणि क्षणभर विश्रांतीसाठी माजी विद्यार्थिनींच्या आवडीने घेण्यात आला.

'या चिमण्यानों परत फिरा रे घराकडे आपल्या' या उक्तीप्रमाणे उपस्थित झालेल्या सर्वच ८० विद्यार्थिनींचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. 'यावे ज्ञानासाठी निघावे सेवेसाठी' हे ब्रीद मनी मानसी बाळगणारा आमच्या माजी विद्यार्थिनी विविध पदांवर आरुढ होऊन आपले कर्तव्य पार पाडीत आहेत. नेतृत्व कर्तृत्व ,आणि दातृत्वाचे वलय स्वयंप्रेरणेने उजळून टाकीत आहेत. प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या दामिनींचे शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले.

याप्रसंगी माजी विद्यार्थिनी संघाच्या सर्व विद्यार्थिनींनी शाळेला यथावकाश सानुग्रह निधी शाळेच्या मुख्याध्यापिका तथा कार्यक्रमाचे अध्यक्षा बनपुरकर मॅडम यांना रोख रकमेच्या स्वरूपात प्रदान केले. तसेच गरजू विद्यार्थिनींना बारावीपर्यंतच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने दत्तक घेण्याचे मानस व्यक्त केले. मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले तेव्हा परत विद्यार्थिनींना शाळेत असल्याचा अनुभव मिळाला. कृतज्ञेतुन कर्म, या उक्तीचा खऱ्या अर्थाने प्रत्यय आलेला दिसत होता. माजी विद्यार्थिनी संघाने, मंचावरील माजी विद्यार्थिनी तथा आदरणीय अधिकारी गणांचे शाल व श्रीफळ फळ देऊन गुरुजनांचा सत्कार केला.

या सर्व कार्यक्रमाची अतिशय महत्त्वाची धुरा व समन्वयकाची भूमिका माधुरी गायकवाड असिस्टंट पोलीस इन्स्पेक्टर आयओपी नागपूर ग्रामीण या माजी विद्यार्थिनीने सांभाळली व कार्यक्रमाची यशस्विता घडवून आणली.

# जिजाऊ ब्रिगेडतर्फे महिला नगरसेवकांचा सत्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय महानायिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त जिजाऊ ब्रिगेड व ओबीसी महिला संघटनेच्या वतीने ४ जानेवारी रोजी ब्रम्हपुरी येथे सावित्री-जिजाऊ दशरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी ३ जानेवारी सावित्रीमाई फुले जयंती ते १२ जानेवारी राष्ट्रमाता जिजाऊ जयंती दरम्यान हा उपक्रम राबवला जात असून, महिलांचे सक्षमीकरण, शिक्षण आणि समाजसुधारणेच्या उद्देशाने विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. मोतीलालजी दर्वे, अध्यक्षीय भाषणात कल्पना तिवाडे यांनी उपस्थितांना यथायोग्य मार्गदर्शन केले. यावेळी ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित महिला नगरसेविका जयश्री कुथे, काजल तलमले, रंजना बुराडे, गीता मेश्राम, हेमलता सिंहगडे, माधुरी उपासे, ज्योती राऊत, पुष्पलता पोपटे, रंजना पिसे, सपना बल्लारपुरे, रेणू ठेंगरी, बबीता आमले यांचा सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमा देऊन सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला. दशरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या लहान मुला-मुलींच्या नृत्याविष्कार व भाषणांनी कार्यक्रमात रंगत भरली. संपूर्ण कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईशा पिलारे यांनी केले. प्रास्ताविक पिंकी राऊत यांनी तर आभार प्रदर्शन श्वेता पिलारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अर्पिता दोनाडकर, शुभांगी बेले, अनुश्री ठेंगरी, विद्या ढोरे, चेतना चिमुरकर, पौर्णिमा पारधी, पूनम नाकतोडे, नैना आजबले, मीनाक्षी सोनकुसरे, राखी पिलारे, मनिषा तलमले, माधुरी भोयर, सुप्रिया तलमले, प्रतिभा दुपारे, रोशनी दर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विनोदिनी

*गुप्ता जी ने सरकारी बैंक में खाता खुलवाया...*
*गुप्ता जी का पूरा नाम है "राज गुप्ता" लेकिन पासबुक में प्रिंट होकर आया - "राजगुप्ता"*
*गुप्ता जी ने बैंक में जाकर इस बारे में बात की... उन्होंने मैनेजर को बताया कि सर राज और गुप्ता के बीच में स्थान (space) रखना है...!*
*एक हफ्ते बाद उनके नए खाते की नई चेकबुक आई जिसमें नाम की जगह लिखा था....*
*"राजस्थानगुप्ता"*

# विद्यार्थी, संस्कृती आणि शिक्षणाचा संगम म्हणजे स्नेहसंमेलन

## नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथे मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व सांस्कृतिक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलगुणांना व्यासपीठ देणारा हा सोहळा पाहण्यासाठी पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. धनराज खानोरकर सर मराठी विभाग प्रमुख, ने.ही. महाविद्यालय, ब्रम्हपुरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य प्रा. सुभाषजी बजाज हे होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सहसचिव भास्करराव उराडे, पालक-शिक्षक समितीचे उपाध्यक्ष विजयजी बनपूरकर उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक नाईक सर, उपमुख्याध्यापक नाकाडे सर व पर्यवेक्षक जीभकाटे सर यांची मान्यवर उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक नाईक सर यांनी स्नेहसंमेलनाचे शैक्षणिक, सांस्कृतिक व संस्कारमूल्य स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. धनराज खानोरकर सर यांनी आपल्या प्रभावी व विनोदी शैलीत विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व, अभ्यासाचे मूल्य तसेच मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे दुष्परिणाम अत्यंत समर्पक उदाहरणांतून समजावून सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मचिंतनाची भावना निर्माण झाली. संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेत शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवण्याची संस्थेची बांधिलकी अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणात प्रा. सुभाषजी बजाज सर यांनी प्रामाणिकपणा, जिद्द, सचोटी व नैतिक मूल्ये हीच विद्यार्थ्यांच्या यशाची खरी गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेली गणेश वंदना, सामूहिक नृत्ये व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर आनंदाने भारावून गेला.

स्नेहसंमेलनाच्या शेवटच्या दिवशी बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाशजी भैया हे उपस्थित होते. बक्षीस वितरक म्हणून रमेशजी भैया, माजी मुख्याध्यापक राऊत सर, बुरले मॅडम व इक्बाल शेख यांची उपस्थिती लाभली. क्रीडा, सांस्कृतिक व बौद्धिक स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून गुणगौरव करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात ॲड. प्रकाशजी भैया यांनी बक्षिसे ही विद्यार्थ्यांसाठी मोठी प्रेरणा असल्याचे नमूद केले.

बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नाईक सर यांनी, सूत्रसंचालन बालपांडे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक नाकाडे सर यांनी केले. हा स्नेहसंमेलन सोहळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा, त्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि शाळेच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची साक्ष देणारा ठरला, अशी भावना उपस्थित मान्यवर व पालकांनी व्यक्त केली.

# समता सैनिक दलात समाजाची नेतृत्व क्षमता

## प्रा.डॉ. युवराज मेश्राम : २०८ वा भीमा-कोरेगाव शौर्य विजय दिन



ब्रम्हपुरी/का.प्र.

वर्तमान काळातील वाढती अराजकता, कट्टर धर्मांधता, हिंसाचार, अंधश्रद्धा आणि समाजातील खालच्या टप्प्यातील सामान्य अतिसामान्य माणसावर होणारा अन्याय, अत्याचार रोखण्याकरता समता सैनिक दलाचे सामाजिक नेतृत्व ही आजची गरज आहे. समाजाचे संघटित नेतृत्व करण्याची क्षमता ही आजच्या घडीला संपूर्ण भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रातील समता सैनिक दलामध्ये आहे. समता सैनिकांमध्ये एक दुसऱ्याबद्दल आदर, सौहार्द, करुणा आणि मैत्रीभाव असल्यामुळे समाज जोडो अभियाना अंतर्गत राजकीय सत्ता समता सैनिक दल प्रस्थापित करू शकते असे प्रभावी विचार प्रा. डॉ. युवराज मेश्राम यांनी व्यक्त केले.

२०८ व्या भीमा कोरेगाव शौर्य विजय दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त समता सैनिक दल विभागीय शाखा ब्रह्मपुरी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. युवराज मेश्राम, उदघाटक इंजि. सुबोध धनविजय उमरेड, सहउद्घाटक शितल खोब्रागडे सहाय्यक पोलीस निरीक्षक, विशेष अतिथी प्रा. एम एन सांगोळे दिघोरी मोठी, ब्रह्मपुरी आगर प्रमुख जयकुमार इंगोले, नगरसेविका मेश्राम, सतीश वारजूरकर चिमूर, रोशन ढोक, समता सैनिक दल संयोजक इंजि. डेव्हिड शेंडे, चंद्रभान राऊत, गंगाधर शेंडे इत्यादी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक गंगाधर शेंडे तर आभार इंजि. डेव्हिड शेंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता समता सैनिक दल विभागीय शाखेच्या सर्व सैनिकांनी परिश्रम घेतले.

❀❀❀❀❀❀


# मेहेर परिवाराचा स्नेहमिलन सोहळा संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी प्रमाणे नवीन वर्षातील पहिल्या शनिवारी मेहेर परिवार ब्रम्हपुरी यांचे कुल दैवत गणबाजी. श्री गणबाजी देवस्थान रुई येथे शहरातील मेहेर परिवाराचा स्नेहमिलन सोहळा नुकताच झाला.

भजन मंडळीचे भजन, गोपाळकाला, स्नेहभोजन या निमित्याने झाले. अमेरिकेत वास्तवात असलेले विजय मेहेर व दीपक फाल्गुन मेहेर यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपूर्ण मेहेर परिवारांनी उपस्थिती दर्शवून हा गणबाजी पूजन सोहळा स्नेह मिलनाने साजरा केला.

# ब्रम्हपुरीत पिकलबॉल इनडोअर गेमची सुरुवात



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरात क्रीडाक्षेत्रात एक महत्त्वाची भर पडली असून, येथे पहिल्यांदाच पिकलबॉल या वेगाने लोकप्रिय होत असलेल्या खेळाची इनडोअर सुविधा सुरू करण्यात आली आहे. ही सुविधा रेल्वे स्टेशन रोडवरील गोल्ड सिनेमा शेजारी ०३ जानेवारीपासून नागरिकांसाठी खुली करण्यात आली आहे.

पिकलबॉल हा टेनिस, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस यांचे मिश्रण असलेला आधुनिक खेळ असून, कमी वेळेत शिकता येणारा आणि सर्व वयोगटांसाठी योग्य मानला जातो. हलका व्यायाम, जलद हालचाल आणि सामाजिक सहभाग यांचा संतुलित अनुभव देणारा हा खेळ सध्या देशभरात वेगाने लोकप्रिय होत आहे. विशेषत: तरुण, कामकाजी वर्ग आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये पिकलबॉलकडे सकारात्मक प्रतिसाद दिसून येत आहे. देशातील अनेक मोठ्या शहरांनंतर आता ब्रह्मपुरीतही या खेळाची सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरिकांना आधुनिक आणि आरोग्यदायी खेळाचा अनुभव घेता येणार आहे. ही संपूर्ण सुविधा इनडोअर स्वरूपाची असल्यामुळे हवामानाचा अडथळा न येता वर्षभर खेळणे शक्य होणार आहे. तसेच खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी आणि कोर्टची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी खेळताना स्पोर्ट्स शूज घालणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे क्रीडा संस्कृतीला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# विविधांगी कार्यक्रमांद्वारे सावित्रीबाई फुलेंची १९५ वी जयंती उत्साहात साजरी

**ने.हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी** - 'स्त्री शिक्षणाच्या बाबतीत आणि एकंदरीत स्त्री सुधारणेच्या बाबत फुले दाम्पत्यांचे योगदान लाखमोलाचे आहे. समस्त स्त्रियांसाठी महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंनी अपार कष्ट, हालअपेष्टा सहन केल्या. पुण्याच्या भिडे वाड्यात १८४८ त्यांनी मुलींची पहिली शाळा काढून इतिहास घडविला आणि सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाची ज्ञानज्योत चेतवली' असे विवेचन कार्य. प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी काढले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयीन प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी पुष्प वाहून सावित्रीबाई फुलेंना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ युवराज मेश्रामांनी केले. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ शर्मा, डॉ खानोरकर,प्रा धिरज आतला, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

**ने. ही. उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी** - दि. ०३ जानेवारी २०२६ रोज शनिवारला नेवजाबाई हितकारिणी माध्य. तथा उच्च माध्य. विद्यालय ब्रम्हपुरी येथे स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या, भारतातील पहिल्या मुख्याध्यापिका, पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळेस कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे उपमुख्याध्यापक नाकाडे सर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे पर्यवेक्षक जीभकाटे सर, वदनलवार सर, बारापात्रे सर, मंगर सर, मराठे मॅडम, कलकोटवार मॅडम, खाडीलकर मॅडम व्यासपीठावर उपस्थित होत्या.

कार्यक्रम प्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला विद्यालयातील शिक्षकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रसंगी बालपांडे मॅडम, सातपुते मॅडम, मराठे मॅडम, उरकुडे मॅडम, खाडीलकर मॅडम त्याचप्रमाणे बेंदेवार सर आणि गायकवाड सर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले नाकाडे सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी खूप मोलाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण मेश्राम सर यांनी तर आभार प्रदर्शन राहुल गावतुरे सर यांनी केले.

**महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी** - महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा महाविद्यालयात दि.३.१.२०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्री बाई फुले यांच्या १९५ व्या जयंती समारोह आणि बालिका दिनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दुधे तसेच प्राचार्य श्री.सुयोग बाळबुधे तंत्रनिकेतन बेटाला यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रसंगी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वरील कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन रासेयो अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे व प्राचार्य डॉ. सचिन दुधे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

**जि.प. शाळा तुलान माल** - ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माल येथे आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. सावित्रीबाईंच्या फोटोला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामपंचायत सरपंच राजकुमार कुतरमारे प्रमुख अतिथी म्हणून विजय कुंभारे, जगदीश मेहेर, चंद्रशेखर चौधरी, नीलिमा यावलकर उपस्थित होत्या. संचालन टीकाराम बोकडे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

**ख्रिस्तानंद विद्यालय ब्रम्हपुरी** - स्थानिक ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मुख्याध्यापिका सिस्टर पावना उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या औचित्याने विद्यालयातील



विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित लघु नाटिका सादर केली. तसेच शाळेतील शिक्षिका प्रीती वाळके यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना यांनी अध्यक्षीय भाषण केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक सूरज मेश्राम यांनी सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा विद्यालयाला भेट दिली. कार्यक्रमाला विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**हिंदू ज्ञान मंदिर** - एकात्मता शिक्षण संस्था द्वारा संचालित, हिंदू ज्ञान मंदिर येथे दि ३ जानेवारी २०२६ रोज शनिवारला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्ते धाकडे सर यांनी सावित्रीबाई फुलेंच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका सय्यद मॅडम यांनी भूषविले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन माडे मॅडम यांनी केले. शाळेतील शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**रमाई महिला मंडळ, पान्होळी** - पान्होळी ता. नागभीड येथील रमाई महिला मंडळ, पंचशील बौद्ध समाज व समता सैनिक दल, पान्होळी (ता. नागभीड, जि. चंद्रपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने थोर समाजसुधारिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन पुण्यव्रता रामटेके (ग्रामसेवक, ग्रामपंचायत पान्होळी) यांच्या हस्ते करण्यात आले. सहउद्घाटक म्हणून मा. सविता बोगडे (सरपंच, ग्रामपंचायत पान्होळी) उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुष्पम पुरुषोत्तम बगमारे (सामाजिक कार्यकर्त्या, पान्होळी) या होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विहार मेश्राम सामाजिक कार्यकर्ता, शुभम साहेब सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी, ब्रह्मपुरी, शरद शेठे सर, धन्याबाई जांगळे मॅडम, आरती रामटेके मॅडम आदींनी मार्गदर्शन केले.

**उपजीविका विकास केंद्र, ब्रम्हपुरी** - भारतातील स्त्री शिक्षणाच्या मुख्य प्रणेत्या, महिलांच्या हक्कासाठी प्रथम आवाज उठविणाऱ्या, भारतातील प्रथम स्त्री शिक्षिका असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त उपजीविका विकास केंद्र, ब्रम्हपुरी येथे जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा समाजसेवक डॉ.उदयकुमार पगाडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिन दिघोरे सर, वर्षा भानारकर मॅडम, अंकिता भानारकर मॅडम उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात युवा समाजसेवक डॉ.उदयकुमार पगाडे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन सहारे सर यांनी तर आभार प्रदर्शन धनश्री ढोरे मॅडम यांनी केले.

**महीला कॉंग्रेस, ब्रम्हपुरी** - भारतातील पहील्या महीला मुख्याध्यापिका सावित्रीआई फुले यांची जयंती ब्रम्हपूरी महीला कॉंग्रेसच्या वतीने कमलाई निवासस्थानी साजरी करण्यात आली. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या ब्रम्हपूरी नगरपरिषद निवडणूकीत निवडणूक आलेल्या नवनियुक्त महीला नगरसेविकांचा देखील सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रम माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नगरसेविका काजल तलमले, नगरसेविका बबीता आमले, नगरसेविका रेणु ठेंगरे, नगरसेविका रंजना पीसे, नगरसेविका जयश्री कुथे, नगरसेविका हेमलता सिंहगडे, नगरसेविका गीता मेश्राम, नगरसेविका ज्योती राऊत, नगरसेविका सपना बल्लारपुरे, नगरसेविका पूष्पलता पोपटे, नगरसेविका रंजना बुराडे, नगरसेविका माधूरी उपासे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महीला कॉंग्रेसच्या शहराध्यक्ष योगिता आमले, माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर, कुडबा उपसभापती सुनिता तिडके, माजी नगरसेविका वनिता अलगदेवे, यांसह महीला कॉंग्रेस कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधा राऊत यांनी तर प्रास्ताविक योगिता आमले यांनी केले. उपस्थितांचे आभार जया कन्नाके यांनी मानले.

**माळी समाज, कोसंबी (खड.)** - ब्रह्मपुरी तालुक्यातील कोसंबी (खड.) येथे ज्ञानाई क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले माळी समाजाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या हस्ते संपन्न झाले. हा कार्यक्रम बाळकृष्णजी ठाकरे सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

यावेळी माळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**त्रिशरण महिला मंडळ, पिंपळगांव (भोसले)** - पिंपळगाव (भोसले) येथे त्रिशरण महिला मंडळ यांच्या सौजन्याने ०३ जानेवारी २०२६ ला ओझ कुंकवाच या नाटकाचा प्रयोग पार पडला. त्याच्या उद्घाटना प्रसंगी उदघाटक म्हणून सुनिलभाऊ धांडे, माजी सरपच ग्रा.प. पिंपळगाव उपस्थित होते. सहउदघाटक सुरेशजी दुनेदार सरपंच ग्रा.पं. पिपळगांव, प्रशांतजी बगमारे, चंद्रुजी मेश्राम, मधुकरजी धुले ग्रामविस्तार अधिकारी पिंपळगांव, जगदिशजी बनकर,उपसरपंच ग्रा.पं. पिंपळगांव, देविदासजी गडे, मा. तं.मु.स. अध्यक्ष, उद्धवजी वासनिक, सचिव भिम संदेश सेवा मंडळ पिंपळगांव, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशवरावजी भुते, माजी सभापतीहोते. उपाध्यक्ष म्हणून डाकरामजी वाघमारे, प्रमुख अतिथी म्हणून संदिपजी मिसार, नवनाथजी तारारे, गणेश पिलारे, आशिषजी मिर्झा, संतोषजी शेबे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

# काँग्रेसचे योगेश मिसार ब्रम्हपुरी नगराध्यक्ष पदावर विराजमान

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्त्वात काँग्रेसने निवडणूकीत घवघवीत यश प्राप्त केले. यामध्ये काँग्रेसचे उमेदवार योगेश मिसार हे प्रचंड बहुमताने नगराध्यक्ष पदाकरीता निवडून आले. यांचा पदग्रहण समारंभ शुक्रवारला नगर पालिकेतील सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. माधूरी सलामे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व




नगराध्यक्ष पदाचे सुत्रे सोपविली.

नुकत्याच पार पडलेल्या नगर पालिका निवडणूकीत काँग्रेस पक्षाने प्रचंड यश प्राप्त केले. नगराध्यक्ष पदाच्या थेट निवडणूकीत काँग्रेस पक्षाचे उमेदवार योगेश बालाजी मिसार यांनी अभूतपूर्व यश संपादन केले. तसेच एकुण २३ नगरसेवकापैकी काँग्रेसने तब्बल २१ जागांवर विजय प्राप्त केला, व एकहाती सत्ता काबीज केली.

नगराध्यक्ष योगेश मिसार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर, नगरसेवक, नागरिक, व नगर पालिकेतील प्रशासकीय कर्मचारी यांच्या सहकार्याने स्वच्छ, पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याकरीता कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले. प्रसंगी नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. माधूरी सलामे यांनी शहराच्या सर्वांगीन विकासाकरीता सर्व प्रकारची मदत देण्याचे आश्वासीत केले.

सदर पदग्रहन कार्यक्रमाला तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, कृ.उ.बा.स.चे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमूरकर, डॉ.राजेश कांबळे, माजी पं.स.सदस्य थानेश्वर कायरकर, माजी पं.स.सभापती नेताजी मेश्राम, डॉ. देविदास जगनाडे, इकबाल जेसानी उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन मंगेश बोंद्रे यांनी केले.

## तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन साजरा

ब्रह्मपुरी/का. प्र.

मराठी पत्रकारितेचे जनक आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२



मध्ये 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून महाराष्ट्रात पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या महान कार्याचे स्मरण म्हणून ब्रह्मपुरी तालुका पत्रकार संघाच्या वतीने मंगळवारी 'पत्रकार दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित पत्रकारांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रा. विजय मुडे हे होते. प्रमुख अतिथी मध्ये ब्रह्मपुरी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय रामटेके, प्रा. डॉ. धनराज खानोरकर, प्रा. डॉ. रवी रणदिवे, नेताजी मेश्राम आदी. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचा प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून झाली. यावप्रसंगी विविध मान्यवरांनी जांभेकर यांच्या जीवनप्रवासावर आणि चरित्रावर प्रकाश टाकला. यामध्ये नेताजी मेश्राम, डॉ. खानोरकर आणि डॉ. रवी रणदिवे यांनी जांभेकरांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडले. पत्रकार संघाचे अध्यक्ष विजय रामटेके यांनी पत्रकारितेतील बदलत्या स्वरूपावर आणि जांभेकरांच्या आदर्शांवर आपले विचार मांडले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रा. विजय मुडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील योगदानावर सविस्तर भाष्य केले. 'जांभेकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत समाज प्रबोधनासाठी लेखणीचा वापर केला. आजच्या पत्रकारांसाठी त्यांचे विचार आणि मूल्ये आजही तितकीच प्रेरणादायी आहेत,' असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रशांत डांगे यांनी तर उपस्थितांचे आभार संतोष पिलारे यांनी मानले. या कार्यक्रमाला पत्रकार संघाचे सचिव गोवर्धन दोनाडकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप शिनखेडे, दीपक पत्रे, नंदू गुड्डेवार, विनोद दोनाडकर, रुपेश देशमुख, राहुल भोयर, प्रशांत राऊत, जगदिश शेन्डे, आशिष डेंगे उपस्थित होते.

## ने.हि. महाविद्यालयाचे प्रा. प्रफुल्ल पराते यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



विभाग स्तरावर नागपूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावला असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झालेली आहे.

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील गणित विषयाचे प्राध्यापक असलेले प्रा.प्रफुल्ल पराते यांनी डाअट चंद्रपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित शिक्षक कर्मचारी - अधिकारी स्पर्धेतील 'एम एस वर्ड व एम एस एक्सेल' या स्पर्धा प्रकारात

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, आई-वडिल, पत्नी खूशी पराते, बहिण ममता उमरेडकर व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रमंडळींनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

नियमित वाचा.. अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

## वाघाच्या हल्ल्यात एक इसम जखमी

ब्रम्हपुरी/का.प्र.

सोमवार, दिनांक ०५/०१/२०२६ ला ब्रम्हपुरी तालुक्यातील शिवसागर तुकूम (मेडकी) येथे दुपारी २.४० वाजता देवराव किसान तोंडरे यांच्यावर वाघाने हल्ला करून गंभीर जखमी केले.

या घटनेचे माहिती मिळताच राऊंड ऑफिसर यांनी घटना स्थळी भेट देऊन गंभीर जखमी असलेले देवराव तोंडरे यांना उपचारा साठी ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी येथे भरती केले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती मिळताच ब्रम्हपुरी पंचायत समिती चे माजी सभापती श्री नेताजी मेश्राम व सुधीर शिवरकर माजी उपसरपंच तोरगाव बूज. व बाला मेश्राम यांनी रुग्णालयात भेट देऊन रुग्णाची प्रकृती विचारपुस केली.

## जि.प. शाळा चोरटी नवरत्न स्पर्धेत अव्वल

**ब्रह्मपुरी/का.प्र.**

**नवरत्न स्पर्धा जिल्हा परिषद केंद्र शाळा वायगाव येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत चोरटी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करीत चमक दाखविली.**

**प्राथमिक गटात चित्रकला स्पर्धेत मोनाली विनोद राऊत, वादविवाद स्पर्धेत नयन लीलाधर पारधी, बुद्धिमापन स्पर्धेत रणवीर सुधाकर शेंद्रे, स्मरणशक्ती स्पर्धेत उत्कर्ष आनंददास सराटे, स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेत शौर्य भीमराव सोन्डवले, स्वयंस्फुर्त लेखन स्पर्धेत सक्षम संदीप ठाकूर, एकपात्री भूमिका अभिनय स्पर्धेत देवांश अरुण राऊत तर माध्यमिक गटात स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धेत अवनी अतुल निमगडे, सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत भूमिका हेमराज ढोरे, श्रुती भीमराव सोन्डवले, स्वयंस्फूर्त भाषण स्पर्धा, वादविवाद स्पर्धेत प्रतिज्ञा विष्णुकांत पत्रे, चित्रकला स्पर्धा व कथाकथन स्पर्धेत अक्षरा दिलीप राऊत, गौरी रामपाल उइके, एकपात्री भूमिका अभिनय स्पर्धेत नक्षम किशोर मेश्राम या विद्यार्थ्यांनी चोरटी शाळेने आपले नैपुण्य दाखवून प्रथम क्रमांक मिळविला.**

### ... QUOTES ...

**"Always stay true to yourself and never let what somebody else says distract you from your goals."**

**- Michelle Obama**

### चारोळी

एकच चप्पल हरवली तरी
चपला दोन घ्याव्या लागतात...
फाईल टेबलवर असली तरी,
लिफाफे खालनू द्यावे लागतात...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# मेंडकी तालुका निर्मितीचा प्रश्न ऐरणीवर!


## राजकीय अनास्थेचा बळी ठरल्याचा आरोप

ब्रम्हपुरी/का.प्र.

शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक वारसा लाभलेल्या ब्रम्हपुरी तालुक्यातील सर्वात मोठे गाव म्हणून मेंडकी गावं ओळखले जाते. मागील ३० वर्षांपासून मेंडकीला तालुका घोषीत करण्याची मागणी खितपत पडली आहे त्यामुळे ४५ गावातील विकास खूंटला आहे. या गावाच्या विकासासाठी मेंडकी तालुका होणे आवश्यक आहे. मागील१० वर्षांपूर्वी मेंडकी तालुका निर्माण संघर्ष समितीच्या पुढाकाराने डॉ.थानेश्वर कायरकर यांच्या नेतृत्वाखाली मेंडकी तालुका निर्मितीसाठी पाठपुरावा केला होता. तेव्हा तालुका होण्याची आशा पल्लवित झाली होती. परंतु राजकीय उदासीनतेत गावांचा विकास होत नसल्याची ओरड होऊ लागली आहे.

ब्रम्हपुरी तालुक्याचे विभाजन झाले तेव्हा नागभिड आणि सिंदेवाही तालुक्याची निर्मिती झाली. मेंडकी शैक्षणिक सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात अग्रेसर असताना या गावाला मोठा राजकीय नेता लाभला नाही. त्यामुळे मेंडकी तालुक्याची मागणी खितपत पडली आहे. त्यामुळे या भागाचा अपेक्षीत विकास झाला नाही. मेंडकीची लोकसंख्या १० हजारच्या जवळपास आहे अवघ्या ९ किमी वर गांगलवाडी, आवळगाव आणि मुडझा हि मोठी गावं आहेत. मेंडकीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय, २ माध्यमिक शाळा, २ कॉन्व्हेट, सिंचन कार्यालय, मंडळ कार्यालय, वन विभागाचे उपकार्यालय, पोलीस सबस्टेशन, विज वितरण कार्यालय, सहकारी भात गिरणी, ३ खाजगी भात गिरणी, कोषा उत्पादन कार्यालय आदींसह अनेक कार्यालये आहेत. गावालगतच्या ९ ते १० किमी परिघात ४० ते ४५ गावे आहेत.

डॉ.थानेश्वर कायरकर यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने, दोनदा आमरण उपोषणे झालीत परंतु शासनाने आश्वासनापलीकडे काहीच केले नाही. मेंडकी तालुका झाल्यास तालुक्याशी निगडित सर्व कामे करणे या परीसरातील नागरीकांना सोईचे होवून श्रम व वेळ वाचेल आणि गावांचा विकास होईल. मेंडकीला तालुका दर्जा मिळण्यासाठी प्रतिक्षेत आणखी किती काळ घालवला लागणार आहे, हे येणारा काळच ठरविणार आहे.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.




## विद्यार्थ्यांनो, जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाने...

(पान क्र. १ वरून)

शेकोकरांनी केले. मुख्य कार्यक्रमाचे संचालन डॉ धनराज खानोरकर तर शिष्यवृत्ती वितरण सोहळयाचे संचालन प्रा.बालाजी दमकोंडवार, प्रा.आकाश मेश्रामांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ अजित खाजगीवालेंनी मानले. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ असलम शेख, डॉ मोहन कापगते, डॉ रतन मेश्राम, डॉ युवराज मेश्राम, डॉ किशोर नाकतोडे, डॉ सुनिल चौधरी, डॉ अरविंद मुंगोले, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ मिलिंद पठाडे, प्रा दलेश परशुरामकर, डॉ कुलजित शर्मा, डॉ दर्शना उराडे, प्रा आकाश मेश्राम, डॉ अभिमन्यू पवार, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर व समिती सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# ने.हि. विद्यालयातील शिक्षक लक्ष्मण मेश्राम यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERTM), पुणे द्वारा शिक्षणक्षेत्राशी संबंधित शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचेतील कौशल्य व नवकल्पना विकसित करण्याच्या उद्देशाने सत्र २०२५-२६ पासून 'शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे घेण्यात आलेल्या विभागस्तरीय 'व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धे'त नेवजाबाई हितकारिणी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ब्रम्हपुरी येथे कार्यरत असणारे स्पर्धा परीक्षेचे जाणकार शिक्षक लक्ष्मण मेश्राम सर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांची व उपस्थितांची मने जिंकत यश संपादन केले व राज्यस्तरीय स्पर्धेकरिता आपली निवड निश्चित केली.



'व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन स्पर्धा' यात लक्ष्मण मेश्राम यांनी 'दहावी/बारावी नापास विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधी' हा विषय घेत विद्यालयाचे नाव नागपूर विभागात उंचावले.

लक्ष्मण मेश्राम यांची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाल्याबद्दल ने. भै. हि. शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलताबाई भैया, सचिव अशोकजी भैया, सहसचिव ॲड. भास्करराव उराडे, सदस्य प्रा. सुभाषजी बजाज, सदस्य गौरवजी भैया यांचेसह प्राचार्य के.एम. नाईक, उपप्राचार्य ए.डब्ल्यू. नाकाडे, पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जीभकाटे आणि शिक्षकवृंद व कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ने.हि. महाविद्यालयात रंगले प्राध्यापकांचे गीतगायन

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची प्राध्यापकांची गीतगायन स्पर्धा प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल दोन तास रंगली. यात संगीत भजनापासून मराठी, हिंदी चित्रपट गीते, भावगीते, नाटयगीते प्रकारांची मेजवानी उपस्थितांना मिळाली.




गीतगायन स्पर्धेत प्रामुख्याने डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ मोहन कापगते, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ अजय खाजगीवाले, डॉ मिलिंद पठाडे, डॉ वर्षा चंदनशिवे, प्रा बालाजी दमकोंडवार, प्रा. निलिमा रंगारी, प्रा प्रियंका उईके, प्रा अभिजित परकरावार, प्रा.अन्सारी, संजय मेश्राम इत्यादींनी भाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. संचालन संजू मेश्राम तर सर्वांचे आभार सांस्कृतिक प्रभारी डॉ पद्माकर वानखडेंनी मानले.


ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404